# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

८८) जिल्हा: नंदुरबार-हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३ फेब्रुवारी २०२३

| AGRO-AWS मागील आठवड्यातील हवामान नोंदी (२७/०१/२०२३ ते ०२/०२/२०२३) | | | | | | | हवामान घटक | भारतीय हवामान विभाग हवामान अंदाज (०४/०२/२०२३ ते ०८/०२/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | दिनांक | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २७.७ | २९.८ | २९.३ | २९ | २७.६ | २६.२ | २७.९ | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३२ | ३२ | ३२ |
| १६.७ | १७.५ | १६ | १६.७ | १९.५ | १२.५ | १६.४ | किमान तापमान (अं.से.) | १२ | १३ | १४ | १५ | १४ |
| अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | स्वच्छ | ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| ९५ | ९५ | ८६ | १०० | ८० | ८३ | ६६ | स. सापेक्ष आर्द्रता (%) | ६५ | ६४ | ६८ | ६५ | ६५ |
| ५५ | ४७ | ४१ | ४३ | ४९ | ४५ | ३० | दु. सापेक्ष आर्द्रता (%) | ३१ | २६ | २४ | २७ | २८ |
| ११ | १० | ६ | ५ | ११ | १० | ६ | हवेचा वेग (किमी/तास) | ७.७ | ८.८ | ८.५ | ६.८ | ८.२ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार, पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहील. किमान तापमान १२ ते १५ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान ३० ते ३२ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित हवामान अंदाज | | दि. ८ ते १४ फेब्रुवारी २०२३ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | पिकात आंतरमशागत करून तणविरहीत ठेवावीत. पिकांवर किडीचा व रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास वेळेवर पीक संरक्षण करावे. हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी “मेघदुत” मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | रब्बी पिकांना पिकांच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. आकाश स्वच्छ असताना फवारणी करावी. |
| गहु | कांडी धरण्याची | गहू पीक ५५ ते ७० दिवसाचे असताना १९:१९:१९ या विद्राव्य खताची २ टक्के (२०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) याप्रमाणे दोन वेळा फवारणी करावी. दाणे भरण्याच्या अवस्थेत २ टक्के युरियाची (२०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) फवारणी करावी. |
| हरभरा | फुलोरा अवस्था | ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकात घाटेअळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास पिकास फुलकळी लागण्याच्या वेळेस पहिली फवारणी करावी. यासाठी २५ किलो निंबोळी पावडर रात्रभर ५० लिटर पाण्यात भिजत ठेवावी. सकाळी कापडाच्या सहाय्याने अर्क काढून त्यामध्ये ४५० लिटर पाणी टाकावे. हे द्रावण १ हेक्टर क्षेत्रावर फवारावे. पुढे १० ते १५ दिवसांनी हेलिओकिल ५०० मिली ५०० लिटर पाण्यातून प्रति हेक्टर या विषाणूजन्य किटकनाशकाची फवारणी करावी. आवश्यकता असेल तर तिसरी फवारणी १८.५ % एस.सी. क्लोरअन्ट्रोनिलीप्रोल १०० मिली हेक्टरला ५०० लिटर पाण्यातून हवामान कोरडे असताना फवारावे. |
| रबी ज्वारी | दाणे भरण्याची | रबी ज्वारीमध्ये लष्करी अळी व कणसातील अळी किडीच्या नियंत्रणासाठी मॅलॅथिऑन ५ टक्के डी.पी. (भुकटी) प्रति हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळणी करावी. |
| उन्हाळी भुईमुग | पेरणी | बीजप्रक्रीया-बियाण्यापासून प्रादुर्भाव होणा-या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बेन्डझिम किंवा ३ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे. |
| उन्हाळी मुग | पेरणी | उन्हाळी मुग पेरणी २० जानेवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान करावी. पेरणीसाठी वैभव, पी.के.व्ही. ए.के. एम.-४, उत्कर्षा, बी.एम. २००२-१, बी.एम. २००३-२ वाणांची निवड करावी. पेरणीचे अंतर: ३० × १० सेंमी अंतर ठेवून पाभरीने मूग पेरावा. एकरी ५ ते ६ किलो बियाणे वापरावे. बीजप्रक्रिया: मुगावर विशेषतः मूळकुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता व उगवण लवकर होण्याकरिता प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा आणि २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. खत मात्रा: २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद प्रती हेक्टरी द्यावे. |
| ऊस | लागवड | सुरु ऊस लागवड १५ फेब्रुवारीपर्यंत करावी. बेणे प्रक्रिया : १०० लिटर पाण्यात ३०० मि.लि. मॅलॅथिऑन (५० इसी) आणि १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम चांगले मिसळावे. त्यामध्ये टिपऱ्या १० मिनिटे बुडवाव्यात. त्यानंतर स्वतंत्रपणे १०० लिटर पाण्यात ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धक एकरी ४ किलो आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू संवर्धक ५०० ग्रॅम मिसळून या द्रावणात टिपऱ्या ३० मिनिटे बुडवाव्यात. त्यानंतर लगेच लागवड करावी. |
| टरबूज व खरबूज | लागवड | लागवडीचा हंगाम: या पिकाची लागवड प्रामुख्याने जानेवारी ते फेब्रुवारीमध्ये करावी. लागवडीसाठी खालील जातींची निवड करावी. कलिंगड जाती : शुगर बेबी, अर्का माणिक, अर्का ज्योती ई. खरबूज जाती : पुसा सरबती, दुर्गापुरा मधू, हरा मधू, अर्का राजहंस, अर्का ज्योत, ई. खत मात्रा: लागवडीपूर्वी ५०:५०:५० किलो नत्र:स्फुरद: पालाश प्रति हेक्टरी द्यावे. |
| पशुसंवर्धन | - | बदलणाऱ्या वातावरणात होऊ शकणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव ओळखून जनावरांना योग्य लसीकरण करून घ्यावे. |
| कुक्कुटपालन | - | परसातील कुक्कुट पालनामध्येहे करावे:<br>1. आपल्या कुक्कुटपालनामधील पक्षांचा स्थलांतरीतपक्षांशी संपर्क टाळा. |

**दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४** **ईमेल: kvk_ndb@yahoo.com**


| | | |
|---|---|---|
| | | 2. पक्ष्यांच्या पाण्याची व खाद्याची भांडीदररोज स्वच्छ धुवा.<br>3. कुक्कुट पक्ष्यांच्या खुराड्यात स्वच्छता ठेवा.<br>4. पक्षांना नियमितपणे लसीकरणकरुन घ्या.<br>5.आपलेकडील पक्षी आजारी पडल्यास किंवामरतुक झाल्यास त्याची माहिती तात्काळनजिकच्या पशुवैद्यकीय अधिका-यास दया. |

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**
**दि. : ३/०२/२०२३**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक**
**जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**